**ठळक बातम्या**

- वन रँक वन पेन्शन योजनेला दहा वर्ष पूर्ण, ही योजना म्हणजे देशाच्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीनं टाकलेलं पाऊल असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती
- विधानसभा निवडणुकीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून महाराष्ट्रात विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार
- झारखंडमध्ये मतदानाच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदार संघांत प्रचारसभांचा धडाका सुरू

  **आणि**
- रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे उद्यापासून १६४ विशेष गाड्या चालवणार

**<><><><><>**

वन रँक वन पेन्शन योजना एकाच श्रेणीत सेवानिवृत्त झालेल्या सर्व सैनिकांना समान निवृत्ती वेतन देणारी आहे, असं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. सेवानिवृत्तीची तारीख गृहित न धरता हे निवृत्तीवेतन लागू केलं जात असल्याने त्याचा फायदा भारतीय सैन्यदलातून निवृत्त झालेल्या सैनिकांना मिळत असतो. वन रँक वन पेन्शन योजनेला दहा वर्ष पूर्ण झाली असून यासाठी चालू आर्थिक वर्षात ४ हजार ४६८ कोटी रुपयांचा निधी राखून ठेवला आहे. यावर्षी ३० सप्टेंबर त्यातील ८९५ कोटी रुपये सेवानिवृत्त सैनिकांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत. वन रँक वन पेन्शन योजनेचा लाभ देशभरातील २५ लाख सेवानिवृत्त

सैनिकांना झाला आहे. दर पाच वर्षांनी या योजनेचा आढावा घेण्यात येतो.  नुकताच जुलै महिन्यात या योजनेचा आढावा घेण्यात आला होता.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यावर म्हटलं आहे की, वन रँक वन पेन्शन योजना लागू करुन आता दहा वर्ष झाली असून देशातील सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीनं टाकलेलं पाऊल आहे. ही त्या सैनिकांना वाहिलेली आदरांजलीही आहे ज्यांनी देशाचं रक्षण करतांना आपल्या प्राणाची आहुती दिली.

<><><><><>

सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. गृहमंत्री शहा यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळं नागरिकांच्या अधिकारांचं रक्षण होत असल्याचं अमित शहा म्हणाले. कर्तव्य निभावत असताना शहीद झालेल्या ३६ हजारांहून अधिक पोलिसांना शहा यांनी श्रद्धांजली अर्पण केली. राष्ट्रीय तपास संस्थेनं या दोन दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. केंद्रीय तपास संस्थांचे अधिकारी, न्यावैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची परिषदेला उपस्थिती आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरला पुन्हा एकदा विशेष राज्याचा दर्जा बहाल करण्याची मागणी करणारा प्रस्ताव विधानसभेत मंजूर झाल्याच्या मुद्द्यावरून सत्ताधारी पक्ष आणि विरोधकांनी आज गदारोळ घातला. या गदारोळामुळे विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

उपमुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे नेते सुरेंद्र कुमार चौधरी यांनी काल हा प्रस्ताव सभागृहात मांडला आणि तो आवाजी मतदानानं मंजूर केला. विधानसभेच्या कामकाजाला आज सकाळी सुरुवात झाल्यानंतर विरोधी पक्षनेते सुनील शर्मा यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या आमदारांनी या प्रस्तावाला विरोध दर्शवत हे कृत्य घटनाबाह्य असल्याचं सांगितलं. विरोधी पक्षातील काही सदस्य सभागृहाच्या मध्यभागी जाऊन निदर्शन करायला सुरुवात केली. सभापती अब्दुल रहीम राठर यांच्या सूचनेवरून सुरक्षा रक्षकांनी गोंधळ घालणाऱ्या सदस्यांना बाहेर काढलं. त्यानंतरही सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी सुरूच राहिल्यानं सभापतींनी सुरुवातीला १५ मिनिटांसाठी आणि त्यानंतर दिवसभरासाठी सभागृहाचं कामकाज स्थगित केलं.

**<><><><><>**

सरकारी नोकरीची भरती प्रक्रिया सुरू झाल्यानंतर त्याबाबतच्या नियमांमध्ये कोणताही बदल करता येणार नाही, असा नियम सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितला आहे. सरन्यायाधीश डी.वाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पाच न्यायमूर्तींच्या पीठानं स्पष्ट केलं की, भरती प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी ठरवलेल्या त्याबाबतच्या नियमांमध्ये प्रक्रिया सुरू झाल्यावर छेडछाड करता येणार नाही. निवडीचे नियम मनमानीपणाचे नसावेत आणि ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि भेदभावरहित असावी, असंही न्यायालयानं सांगितलं आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं ग्राहकाची ओळख पटवण्याच्या म्हणजे केवायसीबाबत काही नियमांमध्ये बदल केले आहेत. या नव्या नियमांनुसार एखाद्या ग्राहकानं ही प्रक्रिया पूर्ण केली असेल, तर त्यांना त्याच बँकेत नवं खातं उघडण्यासाठी किंवा बँकींग

उत्पादनाशी संबंधीत नव्या सेवेचा लाभ घेण्यासाठी पुन्हा ओळख पडताळणीचा अर्ज करण्याची गरज असणार नाही. यासोबतच जर बँकांनी ग्राहकांकडून कोणतीही अतिरिक्त किंवा सुधारित माहिती घेतली असल्यास, त्यांना ती केंद्रीय केवायसी नोंदणी केंद्रात सात दिवसांच्या आत सादर करावी लागणार असल्याचंही रिझर्व्ह बँकेनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून महाराष्ट्रात विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत. उद्यापासून ते १४ नोव्हेंबर पर्यंत मोदींच्या सभा धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चंद्रपूर, चिमूर, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई आणि मुंबई इथं होणार आहेत.

या दौऱ्याच्या पहिल्या दिवशी उद्या धुळ्यात मालेगाव रोड, महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्राजवळ पांजरापोळ गोशाळा इथं प्रधानमंत्री प्रचारसभा घेणार आहेत. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने सभेच्या काळात या भागात विनापरवाना ड्रोन उडवायला प्रतिबंध घालण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या अमरावती जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

काँग्रेसने कर्नाटक आणि तेलंगणा राज्यात दिलेल्या गॅरंटी लागू केलेल्या आहेत. मात्र भाजपाने जाणीवपूर्वक त्या गॅरंटी लागू केलेल्या नाही अशा जाहिराती वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्या आहेत. याबाबतीत काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आज राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेऊन भाजपा विरोधात लेखी तक्रार केली. निवडणूक आयोग काँग्रेसच्या तक्रारीची दखल घेऊन भाजपावर तात्काळ कारवाई करेल अशी अपेक्षा आहे असं अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या मीडिया आणि प्रसिद्धी विभागाचे चेअरमन पवन खेरा यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं.

**<><><><><>**

झारखंडमध्ये मतदानाच्या पहिल्या टप्प्यातल्या मतदारसंघांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया आघाडी यांच्या प्रचारसभांचा धडाका सुरु आहे. हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर झारखंडची जनता नाखूश असल्याचा दावा जेष्ठ भाजपा नेत्या आणि केंद्रीय मंत्री अन्नपुर्णादेवी यांनी हजारीबाग इथं बोलताना केला. झारखंडमधले अनेक प्रकल्प हे हेमंत सोरेन याच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीत पूर्ण झाले आहेत असा दावा  झारखंड मुक्ती मोर्चाच्या कल्पना सोरेन यांनी खुंटी इथल्या सभेत बोलताना केला. काँग्रेस, राजद, ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन तसंच इतर पक्षही झारखंडच्या विविध भागात सभा घेत आहेत. झारखंडमध्ये या महिन्यात १३ आणि २० अशा दोन टप्प्यात मतदान होत आहे.

**<><><><><>**

रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे उद्यापासून १६४ विशेष गाड्या चालवणार आहे. यादृष्टीनं रेल्वेनं सुमारे ४७६ गाड्यांचं नियोजन केले आहे. दरम्यान मागच्या छत्तीस दिवसांमध्ये ४ हजार ५२१ रेल्वे गाड्या चालवल्या, ६५ लाख प्रवाशांनी याचा लाभ घेतल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली. या

महिन्याच्या ४ तारखेला एकाच दिवसात तीन कोटींपेक्षा जास्त प्रवाशांनी रेल्वे प्रवास केल्याचंही मंत्रालयानं कळवलं आहे.

**<><><><><>**

आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि अरुणाचल प्रदेश या राज्यातल्या महत्त्वाच्या आठ खनिज खाण लिलावाची प्रक्रिया आज पूर्ण झाली. या खाणींमध्ये फॉस्फेट, ग्रेफाइट आणि वॅनेडियम ही खनिज आहेत. ही खनिजं उच्च तंत्रज्ञान आणि हरित ऊर्जेच्या वाढीसाठी आवश्यक आहेत.

खनिज क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या दिशेनं टाकलेले हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं खाण मंत्रालयानं म्हटलं आहे. या लिलावामुळे जागतिक खनिज अर्थव्यवस्थेत भारत सक्षम स्पर्धक म्हणून स्वतःची ओळख निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला.

**<><><><><>**